# महाराष्ट्र शासन

## वनविभाग

## मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर

(शासकीय मुद्रणालयाजवळ, झिरो माईल्स, सिव्हील लाईन्स, नागपूर-४४०००१, दुरध्वनी क्रमांक ०७१२-२५६४५६९)

**जाहिरात क्रमांक २४००, दिनांक २२ सप्टेंबर, २०१६**

**(अर्ज फक्त ONLINE पद्धतीनेच स्विकारण्यात येतील)**

**सरळसेवा वृत्तस्तरीय पदभरती-२०१६ मधील वनरक्षक संवर्गातील रिक्त पदे भरण्याकरिता जाहिरात.**

**वनरक्षक** पदावर नियुक्तीसाठी आवश्यक पात्रता धारण करित असलेल्या व वनविभागात भरतीसाठी ईच्छुक असलेल्या उमेदवारांकडून दिनांक १७.१०.२०१६ रोजी सायंकाळी ६.०० वाजेपर्यंत Online पद्धतीने अर्ज मागविण्यात येत आहे. ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याच्या सूचना Mahaonline या संस्थेच्या https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहेत.

तसेच पदभरतीची सविस्तर जाहिरात https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर आणि वनविभागाच्या www.mahaforest.nic.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. अर्ज भरण्यापुर्वी उमेदवाराने संपुर्ण जाहिरात व त्यातील अनुषंगिक सूचना काळजीपुर्वक वाचाव्यात.

**नागपूर वनवृत्तातील वनरक्षक संवर्गातील रिक्त पदसंख्येचा तपशिल खालीलप्रमाणे आहे.**

**सन २०१६ करीता वनरक्षकांच्या रिक्त पदांचा तपशिल खालिलप्रमाणे**

| अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| ९ | ७ | ३ | ३ | ० | १ | ० | १४ | ४७ | ८४ |

**वरील उल्लेखित वनरक्षकांच्या पदांकरिता प्रवर्ग निहाय समांतर आरक्षण खालीलप्रमाणे आहे.**

| विशेष/समांतर आरक्षण | अजा | अज | विजा-अ | भज-ब | भज-क | भज-ड | विमाप्र | इमाव | खुला | एकूण |
|---|---|---|---|---|---|---|---|---|---|---|
| महिला | ३ | ३ | १ | १ | ० | ० | ० | ४ | १४ | २६ |
| प्रकल्पग्रस्त/धरणग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ३ |
| भुकंपग्रस्त | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | १ |
| माजी सैनिक | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | २ | ७ | ११ |
| अतिउच्च गुणवत्ताधारक खेळाडू | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ३ |
| होमगार्ड | ० | ० | ० | ० | ० | ० | ० | १ | २ | ३ |
| अंशकालीन उमेदवार | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ५ | ८ |
| रोजंदारी वनमजूर | १ | १ | ० | ० | ० | ० | ० | १ | ५ | ८ |
| सर्वसाधारण | ३ | १ | २ | २ | ० | १ | ० | ३ | ९ | २१ |
| **एकूण** | ९ | ७ | ३ | ३ | ० | १ | ० | १४ | ४७ | ८४ |

**विशेष टिप :** १.नागपूर वनवृत्तांकरीता वरील नमुद केलेल्या रिक्त पदांचे अनुषंगाने निवड झालेल्या उमेदवारांना नागपूर वनवृत्तांतर्गत, नागपूर/वर्धा/भंडारा व गोंदिया जिल्ह्यामधील कोणत्याही ठिकाणी नियुक्ती देण्यात येईल.

२.जाहिरातीतील नमुद केलेल्या पदसंख्या पुढील एक वर्षात रिक्त होणाऱ्या पदावर आधारीत असल्याने सदर पद संख्येत आरक्षित व समांतर आरक्षित पद संख्येत बदल होण्याची शक्यता आहे. बदल झाल्यास त्याप्रमाणे वरील संकेतस्थळावर प्रसिद्ध करण्यात येईल. सन-२०१६-१७ मधील पदे रिक्त होतील या प्रत्याशेने पदभरती करण्यात येत आहे. ज्या प्रवर्गाचे पद (उभे व समांतर आरक्षणाप्रमाणे) काही अपरिहार्य कारणास्तव रिक्त न झाल्यास नियुक्ती करण्यात येणार नाही, याची उमेदवारांनी नोंद घ्यावी.

३.महिला उमेदवारांनी त्यांचे अर्ज महिला समांतर आरक्षणात करणे आवश्यक आहे. इतर समांतर आरक्षणात केलेले अर्ज अस्विकृत केल्या जाईल.

४.सन २०१६-१७ ची दर्शविलेली पदे हि पदोन्नती व सेवानिवृत्तीने रिक्त होणारी असल्याने ती पदे रिक्त झाल्यानंतरच निवड झालेल्या उमेदवारांना नियुक्ती देण्यात येईल. यादी उमेदवारांनी नोंद घ्यावी.

| वेतनश्रेणी | |
|---|---|
| वनरक्षक | रु. ५२००-२०२०० ग्रेड पे रु. १८००. |

E:\AA\U\BHARTI\Recru.16\FGAdvertisement_Recruit_16-17.docx

१) **पात्रतेच्या अटी व शर्ती :-**

१.१) वरील नमुद पदांकरीता अर्ज केलेल्या मागासवर्गीय उमेदवारांना नजीकच्या कालावधीतील सक्षम प्राधिकाऱ्याने दिलेले जातीचे प्रमाणपत्र आवश्यक राहील. अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार वगळता अन्य मागासवर्गीय उमेदवारांसाठी उन्नत व प्रगत गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम अधिकाऱ्यांचे (२०१४-२०१५) प्रमाणपत्र आवश्यक राहील.

१.२) विवाहीत/विधवा महिला उमेदवारांनी पूर्वाश्रमीच्या नावाने (By Birth) अर्ज करणे आवश्यक आहे.

१.३) वरील पदांकरीता निवडलेल्या उमेदवारांना नियुक्ती दिल्यानंतर नविन परिभाषीत अंशदान निवृत्ती योजना लागु राहील.

२) **वनरक्षक पदाची शैक्षणिक पात्रता :-** महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभागाकडील अधिसूचना क्र.एफएसटी-१२/१३/प्र.क्र.६५१/फ-४, दि.०४ जुन, २०१४ व दिनांक १३ मे २०१५ च्या अधिसुचनान्वये, उच्च माध्यमिक शालांत प्रमाणपत्र परिक्षा (इयत्ता १२ वी) विज्ञान किंवा गणित किंवा भुगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह उत्तीर्ण केलेली असावी.

अ) जिल्हा सैनिक कल्याण अधिकारी, अमरावती/नागपूर यांनी असे स्पष्ट केले आहे कि, महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शासन निर्णय क्रमांक आरटीए-१०८२-२३२७-सीआर-६३-१६-अ, दि. ५ ऑक्टो १९८९ नुसार एसएससी पास माजी सैनिकांना ज्यांची सैन्य सेवा १५ वर्ष झाली त्यांना ज्या पदासाठी पदवी हि पात्रता आवश्यक आहे, त्या ठिकाणी ग्राह्य धरण्यात येते. वनविभागाव्दारे करण्यात येत असलेल्या वनरक्षक पदांच्या भरतीमध्ये, महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभागाकडील क्रमांक एफएसटी ११/१३/प्र.क्र.६१८/फ-४, दिनांक ०६ मार्च, २०१४ चे पत्रान्वये माजी सैनिक उमेदवारांकरीता १० वी ही शैक्षणिक अर्हता आवश्यक आहे. त्यामुळे एसएससी पास आणि कमीत कमी १५ वर्ष सैन्य सेवा झालेले माजी सैनिक वनरक्षक पदासाठी पात्र राहील.

ब) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शैक्षणिक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

क) महाराष्ट्र शासनाने वेळोवेळी अधिसुचित केलेल्या नक्षलग्रस्त भागातील अनुसूचीत जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचाऱ्यांच्या पाल्यांनी माध्यमिक शालांत परिक्षा उत्तिर्ण केली असल्यास (इयत्ता १० वी) वनरक्षक या पदासाठी पात्र ठरविण्यात येईल.

**टिप - नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेले किंवा गंभीररित्या जखमी झालेले वनखबरे व वनकर्मचाऱ्यांचे संबंधात वरील प्रयोजनाकरिता शासकीय वैद्यकीय अधिकारी आणि पोलीस खात्यातील घटनेच्या कार्यक्षेत्रातील सक्षम पोलीस अधिकारी यांचेकडुन निर्गमित केलेले प्रमाणपत्र विचारार्थ घेण्यात येईल.**

**३. वयोमर्यादा :-**

३.१ **वनरक्षक पदाकरीता** उमेदवाराचे वय दिनांक **२६ सप्टेंबर, २०१६** रोजी किमान १८ वर्षापेक्षा कमी व कमाल २५ वर्षापेक्षा जास्त नसावे. ( मागासवर्गीयाकरीता २५+५=३० वर्षे )

३.२ <u>उच्च वयोमर्यादा खालील बाबतीत शिथिलक्षम आहे.</u>

(एक) महाराष्ट्र शासनाने मान्यता दिलेल्या मागासवर्गीय उमेदवाराच्या बाबतीत ५ वर्षापर्यंत.

(दोन) महाराष्ट्र शासन, सामान्य प्रशासन विभाग, शुध्दीपत्रक क्र. मासैक-१०-१०/प्र.क्र.२७१/१०१६-अ, दि. २० ऑगस्ट २०१० अन्वये माजी सैनिकांसाठी शासन सेवेतील वर्ग-३ व वर्ग-४ मधील पदांसाठी नेमणुकीकरिता विहीत वयोमर्यादेतील सुट ही सदर उमेदवाराच्या सशस्त्र दलात झालेल्या सेवेइतका कालावधी अधिक ३ वर्षे इतका राहील.

(तीन) पात्र खेळाडूच्या बाबत ५ वर्षापर्यंत.

(चार) धरणग्रस्त/प्रकल्पग्रस्त/भूकंपग्रस्त उमेदवारांच्या बाबतीत खुल्या व मागास प्रवर्गातील उमेदवारांकरिता सरसकट कमाल वयोमर्यादा ४५ वर्षे राहील.

(पाच) वनविभागातील मजूरांना महसूल व वनविभाग शासन शुध्दीपत्रक एलएबी १०१४/प्र.क्र.२५२/फ-९, दिनांक ३१/७/२००३ नुसार खुल्या प्रवर्गातील उमेदवारांकरीता वयाच्या ३० वर्षानंतर तसेच मागासवर्गीय उमेदवारांसाठी ३५ वर्षानंतर (संबंधीत मजूर) जेवढी वर्ष वनविभागात कार्यरत आहेत, तेवढ्या वर्षानी वयाची अट शिथिलक्षम.

(सहा) महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग शासन निर्णय क्रं. पअक-१००९/प्रक्र.२००/२००९१६-अ, दि. २७/१०/२००० अन्वये पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना समांतर आरक्षण लागु करणे व वयोमर्यादेत सवलत देणेबाबत तरतुद आहे, त्याप्रमाणे वयोमर्यादेत सवलत देणेबाबत अट शिथिलक्षम राहील. (**मुद्या क्र.७.१५ वाचावे.**)

(सात) महाराष्ट्र शासन महसूल व वनविभाग शासन निर्णय क्रमांक बैठक-२०१०/प्र.क्र.७/फ-९/मुंबई दिनांक १६ ऑक्टोंबर २०१२ अन्वये शासनाने अंशकालीन कर्मचा-याबाबत निर्गमित केलेल्या शासन निर्णयानुसार त्यांच्याकरिता शासनात सरळसेवा भरतीमध्ये समांतर आरक्षण ठेवून पदे आरक्षित केली आहे. त्याप्रमाणे वनविभागात सरळसेवा भरतीवेळी पात्रता पुर्ण करित असणा-या रोजंदारी मजूरांना गट-क व गट-ड मध्ये १० टक्के आरक्षण ठेवण्यांत आलेले आहे. त्यानुसार अंशकालीन कर्मचाऱ्यांना वयाच्या संदर्भात देण्यांत आलेली सूट (४६ वर्षे) रोजंदारी मजूरांना देण्यांत आली आहे.

४. **वनरक्षक पदासाठी शारीरिक पात्रता :-**

४.१ वनरक्षक पदाच्या सर्व उमेदवारांकरिता.

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये ) | १६३ | १५० |
| छातीचा घेर<br>अ) न फुगवता (से.मी. मध्ये )<br>ब) फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्रॅ.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

४.२ अनुसूचित जमाती मधील उमेदवारासाठी खालील प्रमाणे शिथिलक्षम

| शारीरीक माप | उमेदवाराचा प्रवर्ग | |
|---|---|---|
| | पुरुष | स्त्री |
| उंची (से.मी. मध्ये) | १५२.५ | १४५ |
| छातीचा घेर<br>अ) न फुगवता (से.मी. मध्ये )<br>ब) फुगवून (से.मी. मध्ये) | <br>७९<br>८४ | <br>--<br>-- |
| वजन (कि.ग्र.मध्ये) | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात | वैद्यकीय मापानुसार उंची व वयाच्या योग्य प्रमाणात |

४.३ (अ) दूर दृष्टी आणि जवळील दृष्टीचे चष्मे व विना चष्म्याचे खालील मानक पूर्ण करतात.

<u>दूरदृष्टी</u>

| अधिक चांगला डोळा (सुधारलेली दृष्टी) | वाईट डोळा |
|---|---|
| ६/६ | ६/१२ |
| किंवा | किंवा |
| ६/९ | ६/९ |

<u>जवळील दृष्टी</u>

| अधिक चांगला डोळा | वाईट डोळा |
|---|---|
| J.१ | J.११ |

**प्रत्येक डोळा संपूर्ण क्षेत्र दृष्टीयुक्त असणे आवश्यक आहे.**

(ब) शासकीय वैद्यकीय अधिकारी किंवा वैद्यकीय तपासणी संदर्भात प्राधिकृत केलेल्या वैद्यकीय विशेषज्ञांकडून वैद्यकीय पात्रता प्रमाणित करण्यात येईल. वैद्यकीय चाचणीमध्ये तिरळेपणा, रंग व रात आंधळेपणा, आतल्या बाजूला फेंगाडे असलेले गुडघे, सपाट पाय, त्वचा व छातीचे रोग या संबंधीचा आणि अपर प्रधान मुख्य वनसंरक्षक (प्रशासन-दुय्यम संवर्ग) यांनी वेळोवेळी विहित केलेल्या अन्य वैद्यकीय चाचणीचा समावेश राहील.

(क) शासनाने वेळोवेळी घोषित केलेल्या नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या उमेदवारांना खाली नमूद केल्याप्रमाणे शारिरीक पात्रतेमध्ये सुट देण्यात येईल.

नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मरण पावलेल्या किंवा गंभीररित्या जखमी झालेल्या वनखबरे व वनकर्मचा-यांच्या मुलांना खाली नमूद केल्याप्रमाणे सुट देण्यात येईल.

१. उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारासाठी २.५ से.मी.

२. छाती :- मोजणी आवश्यक नाही.

(ड) **<u>खेळाडू प्रवर्ग :-</u>** विहित शैक्षणिक अर्हता धारण करणाऱ्या व वयोमर्यादेची अट पूर्ण करणाऱ्या खेळाडूंना, विहित उंचीमध्ये २.५ से.मी. इतकी सवलत देण्यात येईल.

(इ) **वनकर्मचाऱ्यांच्या पाल्यांना शारीरिक अर्हतेत सवलत :-** सेवेत कार्यरत असतांना मृत्यू पावलेल्या वनकर्मचा-यांच्या एका मुलास किंवा मुलीस शारीरिक पात्रतेत खालील प्रमाणे सवलत देण्यात येईल.

१. उंची :- पुरुष आणि स्त्री उमेदवारास २.५ से.मी.

२. छाती :- पुरुष उमेदवारांना २.० से.मी. न फुगवता व १.५ से.मी. फुगवून.

(ई) **किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे :-**

शासन पत्र क्रमांक एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-७, दिनांक २४.०८.२०११

उपरोक्त शासन पत्रातील निर्देशानुसार महाराष्ट्र नागरी सेवा (सेवेच्या सर्वसाधारण शर्ती) नियम १९८१ मधील परिशिष्टनूसार वनरक्षक या पदासाठीही उंचीच्या प्रमाणात वजन आवश्यक राहील. वैद्यकीय तपासणी करणाऱ्या व्यक्तींच्या मार्गदर्शनाकरिता सर्वसाधारण नियमानुसार पुरेशी मानली जाणारी किमान सापेक्ष उंची, वजन व छातीची मोजमापे दर्शविणारा तक्ता नमुद आहे. त्याचप्रमाणे कार्यवाही होईल.

**५. वनरक्षक पदाची निवड पध्दत :-**

५.१ उमेदवारांचे अर्ज प्राप्त झाल्यानंतर ते विहीत शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादा व विशेष सुट करिता दावे इत्यादीची पुर्तता करतात किंवा कसे ? याची शहानिशा करण्यात येईल.

५.२ वनरक्षक पदाच्या सेवाप्रवेश नियमानुसार उमेदवार किमान शारिरीक पात्रता धारण करतात किंवा कसे? हे निश्चित करण्याच्या दृष्टीने उमेदवारांची मोजमापे स्थानिक शासकीय वैद्यकीय अधिकारी यांच्या उपस्थितीत घेण्यात येतील.

५.३ जे उमेदवार किमान शैक्षणिक पात्रता, वयोमर्यादेची अट तसेच किमान शारिरिक पात्रता धारण करतात त्या पात्र उमेदवारांची खालीलप्रमाणे शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल.

बहुतांश वनरक्षकांचे कार्यक्षेत्र हे भौगोलिक दृष्ट्या अतिदुर्गम भागात अस्तित्वात आहे. वनरक्षक हे वनविभागातील क्षेत्रीय स्तरावरील आघाडीवरील (Frontline Staff) पद असून वनरक्षकाने वनसंरक्षणाच्या दृष्टीने वनक्षेत्रात पायी फिरुन गस्त घालणे आवश्यक असते. त्यामुळे वनरक्षक या पदासाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांना शासन निर्णय क्र.एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दिनांक ३० जुलै २०११ अन्वये २५ कि.मी. पुरुष उमेदवारासाठी तर १६ कि.मी. स्त्री उमेदवारासाठी चालण्याची शारीरीक क्षमता चाचणी घेण्यात येईल. **उपरोक्त चाचणी ही चार तासामध्ये पुर्ण करणे बंधनकारक राहील.**

<u>शारीरीक क्षमता धावण्याची चाळणी चाचणी</u>

शारीरीकदृष्ट्या सक्षम उमेदवारांची प्राधान्याने निवड करण्याच्या विहीत केलेल्या शारीरीक मोजमापाप्रमाणे पात्र उमेदवारांची प्रथम शारीरीक क्षमता धावण्याची चाळणी चाचणी घेण्यात येईल. **या चाचणी परीक्षेच्या वेळी उमेदवाराने शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडून शारीरीकदृष्ट्या सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र व जाहिरातीचे शेवटी जोडलेले वचनपत्र सोबत आणणे आवश्यक राहील. सदर दोन्ही प्रमाणपत्राशिवाय चाळणी चाचणी परीक्षेत भाग घेता येणार नाही, याची सर्व उमेदवारांनी नोंद घ्यावी.** ही चाळणी चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची असून त्यामधील गुण (उपसचिव, महसुल व वनविभाग यांचे पत्र क्र.एफएसटी-०७/११/प्र.क्र.२८७/फ-४, दि. २१ जुलै, १४ अन्वये) खालिलप्रमाणे राहील.

| | | |
|---|---|---|
| क्रमांक १ ते ३ वरील आलेले | - | यांना प्रत्येकी १० गुण. |
| क्रमांक ४ ते ८ वरील आलेले | - | यांना प्रत्येकी ०८ गुण. |
| क्रमांक ९ ते १५ वरील आलेले | - | यांना प्रत्येकी ०६ गुण. |
| क्रमांक १६ ते २५ वरील आलेले | - | यांना प्रत्येकी ०४ गुण. |
| क्रमांक २६ ते ४० वरील आलेले | - | यांना प्रत्येकी २.५ गुण. |
| क्रमांक ४१ वरील आलेले | - | यांना प्रत्येकी ० गुण. |

सदर धावण्याची चाळणी चाचणी पुरुष उमेदवारांनी ५ कि.मी. व महिला ३ कि.मी. जास्तीत-जास्त ३० मिनिटामध्ये पुर्ण करणे आवश्यक राहील. ही चाळणी चाचणी स्पर्धात्मक स्वरुपाची व बाद पध्दतीची असेल. यामध्ये प्रथम येणारे पदसंख्येच्या तीन पट ऐवढे उमेदवार पुढील फेरीसाठी पात्र ठरविण्यात येतील.उमेदवारांची संख्या निश्चित करतांना विहित करण्यात आलेले आरक्षणही विचारात घेण्यात येईल.

**शारीरीक पात्रता तपासणी/शारीरीक क्षमता धावण्याच्या चाळणी चाचणीचे स्थळ/दिनांक/वेळ उक्त संकेतस्थळावर प्रसिध्द करण्यात येईल.**

५.४ (i) वरील प्रमाणे पुढील फेरीसाठी पात्र ठरलेल्या उमेदवारांचे इयत्ता १२ वी मधील (उच्च माध्यमिक शालांत परिक्षा विज्ञान किंवा गणित किंवा भुगोल किंवा अर्थशास्त्र या विषयासह उत्तीर्ण केलेली) व [(ii) शासनाद्वारे घोषित नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसूचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षलवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यु/जखमी झालेले वनरक्षक व वनकर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी तसेच महाराष्ट्र शासन, महसुल व वनविभागाकडील दिनांक ०६ मार्च, २०१४ चे पत्रान्वये माजी सैनिक उमेदवारांकरीता इयत्ता १० वी मधील (माध्यमिक शालांत परिक्षा.)] एकुण गुण विचारात घेऊन गुणानुक्रम निश्चित करण्यात येईल. इयत्ता १० वी /१२ वी मधील गुणांना ८७.५% एवढे भारांकन (Weightage) देण्यात येईल.

५.५ गुणवत्ता यादी तयार करतांना इयत्ता १२ वी मधील (उच्च माध्यमिक शालांत परिक्षा विज्ञान किंवा गणित किंवा भुगोल किंवा अर्थशास्त्रया विषयासह उत्तीर्ण केलेली) [नक्षलग्रस्त भागात वास्तव्य असलेल्या अनुसुचित जमाती प्रवर्गातील उमेदवार, नक्षवाद्यांच्या हल्ल्यात मृत्यु/जखमी झालेले वनरक्षक व वन कर्मचाऱ्यांच्या मुलांसाठी तसेच माजी सैनिक उमेदवारांकरीता इयत्ता १० वी (माध्यमिक शालांत परिक्षा)] मधील गुणांच्या टक्केवारीचे ८७.५% भारांकन व १२.५% भारांकनाकरीता ५ कि.मी./३ कि.मी. धावण्याच्या चाचणी परिक्षेमध्ये प्राप्त केलेले गुण यांची बेरीज करुन उमेदवारांची गुणवत्ता यादी तयार करण्यात येईल.

**अर्ज सादर केलेल्या उमेदवारास कागदपत्रांच्या छाणनी शिवाय शारिरीक क्षमता चाळणी चाचणी/शारिरीक पात्रता तपासणीकरीता परवानगी देण्यांत येत आहे. <u>त्यामुळे उमेदवारांच्या कागदपत्रांची तपासणी केल्यानंतर उपलब्ध होणाऱ्या माहितीशी उमेदवाराने अर्जात नमुद केलेल्या माहितीचा ताळमेळ बसत नसल्यास उमेदवारास भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर अपात्र करण्यात येईल. व त्यानंतर त्याचा कोणताही हक्क वा उजर राहणार नाही. त्यामुळे उमेदवाराने संबंधित पदांच्या पात्रतेच्या अटी अभ्यासूनच अर्ज सादर करावा.</u>**

**६. गुणवत्तेनुसार निवड झालेल्या वनरक्षक पदाच्या उमेदवारांनी दस्तावेज-तपासणीच्या वेळी सादर करावयाची कागदपत्रे...**

१. शैक्षणीक अर्हतेचे प्रमाणपत्र

२. वयासंबधी दाखला (जन्माचा दाखला/ शाळा सोडण्याचे प्रमाणपत्र/शालांत परिक्षेचे प्रमाणपत्र)

३. जातीचे प्रमाणपत्र /जात वैधता प्रमाणपत्र

४. अधिवास प्रमाणपत्र

५. नॉन-क्रिमीलेअर प्रमाणपत्र ( विमुक्त जाती/भटक्या जमाती/विशेष मागास प्रवर्ग/इतर मागास प्रवर्ग )सदर प्रमाणपत्र (२०१४-१५ या वर्षाचे) दि.३१ मार्च, १६ पर्यंत वैध असणे आवश्यक आहे. वैध प्रमाणपत्र नसलेल्या उमेदवारांचा विचार केल्या जाणार नाही व अश्या उमेदवारांना राखीव संवर्गाचा लाभ घेता येणार नाही.)

६. शासकीय/निमशासकीय कर्मचारी असल्यास संबंधित प्राधिकरणाच्या सक्षम प्राधिका-यांची मंजूरी घेतल्याचे प्रमाणपत्र

७. समांतर आरक्षणांर्तगत अर्ज केलेल्या उमेदवारांना वर नमुद करण्यात आलेल्या दाखल्याशिवाय समांतर आरक्षणाचा लाभ मिळणार नाही

८. सामान्य प्रशासन विभाग शा.नि.क्र.प्र.अ.क्र.१००५/प्र.क्र.३६/०५/६-अ, दिनांक २६.५.२००५ नुसार लहान कुटूंब असल्याचे विहीत नमुन्यातील प्रतिज्ञापत्र प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक आहे) नमुना जोडलेला आहे.

९. ऑनलाईन पध्दतीने उमेदवारांनी अर्ज सादर करतेवेळी वर नमूद केल्याप्रमाणे आवश्यक प्रमाणपत्र नसल्याचे निर्दशनास आल्यास तसेच अर्जात नमूद केलेली माहिती खोटी आढळल्यास निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर त्यांना अपात्र ठरविण्यांत येईल किंवा नियुक्ती दिल्यानंतर निदर्शनास आल्यास त्यांची नियुक्ती रद्द करण्यांत येईल व त्यानंतर याबाबत उमेदवारांची कोणत्याही प्रकारची तक्रार वा उजर ऐकून घेतली जाणार नाही.

**<u>निवडसुचीची कालमर्यादा</u>**

निवड समितीने तयार केलेली निवड सुची १ वर्षासाठी किंवा निवड सुची तयार करण्यासाठी ज्या दिनांकापर्यंतची रिक्त पदे विचारात घेण्यात आली आहे त्या दिनांकापर्यंत, जे नंतर घडेल त्या दिनांकापर्यंत विधीग्राह्य ठरेल. त्यानंतर ही निवडसुची व्यपगत होईल.

**७. वनरक्षक पदांकरीता सर्वसाधारण अटी :-**

७.१ सेवाप्रवेश नियमातील अटीनुसार संबंधित संवर्गातील उमेदवारांना मराठी भाषा वाचता, लिहीता व बोलता येणे आवश्यक आहे.

७.२ उमेदवार महाराष्ट्र राज्याचा कायमचा रहिवासी असावा.

७.३ महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक मुकंप-१००९/प्र.क्र./२०७/२००९/१६ अ दिनांक २७ ऑगस्ट २००९ अन्वये प्रकल्प प्रस्तांना असलेले ५ % समांतर आरक्षण त्यांच्यासाठीच राखुन ठेऊन या आरक्षणाअंतर्गत भुकंपग्रस्तांसाठी ठेवलेले आरक्षण काढुन भुकंपग्रस्तांसाठी स्वतंत्रपणे २ % समांतर आरक्षण लागु राहील.

७.४ सामान्य प्रशासन विभाग परिपत्रक क्रमांक एसआरव्ही-१०९७/प्र.क्र.३१/९८/१३-अ दिनांक १६-३-१९९९ अन्वये समांतर आरक्षण हे कप्पीकृत आरक्षण असल्याने सामाजिक आरक्षणाच्या प्रत्येक प्रवर्गामध्ये (उभे आरक्षण जसे अ.जा.,अ.ज.,वि.ज.(अ),भ.ज.(ब),भ.ज.(क),भ.ज.(ड), वि.मा.प्र., इ.मा.व. आणि इतर प्रवर्ग) विशेष आरक्षणानुसार होणाऱ्या राखीव पदाची संख्या, पदांचा तपशिल या शिर्षातंर्गत दर्शविण्यात आलेला आहे. समांतर आरक्षणाचे उमेदवार उपलब्ध न झाल्यास सर्व समांतर आरक्षणाची पदे त्या त्या सामाजिक प्रवर्गातुन भरण्यात येतील.

७.५ (i) वि.जा.(अ), भ.ज.(ब), भ.ज.(क), भ.ज.(ड), वि.मा.प्र. व इ.मा.व. या प्रवर्गातील उमेदवारासाठी शासन परिपत्रक सामाजिक न्याय, सांस्कृतीक न्याय व विशेष सहाय्य विभाग क्र. सी.बी.सी.-१०/२००६/प्र.क्र.१५/मावक-५ दिनांक ३०.०६.२००६ सोबतच्या सुधारित नमुण्यात त्यांची जात उन्नत व प्रत गटात मोडत नसल्याचे (नॉन क्रिमीलेअर) निकटतम वर्षाच्या कालावधीचे प्रमाणपत्र सादर करणे आवश्यक आहे. सदर सुधारित प्रमाणपत्र अर्जासोबत जोडले नसल्यास अर्ज नाकारण्यात येईल.

(ii) खुल्या प्रवर्गातील व मागासप्रवर्गातील इतर मागासवर्ग, भटक्या जमाती (क) व भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील महिलासाठी असलेले ३० टक्के आरक्षण उन्नत व प्रगत व्यक्ति/गटातील (क्रिमीलेअर) कुटुंबातील महिला सदस्यांना अनुज्ञेय राहणार नाही.

७.६ महिला उमेदवारांना ३० टक्के समांतर आरक्षणाचा लाभ घ्यावयाचा असल्यास (अनुसूचित जाती व अनुसूचित जमाती प्रवर्ग वगळून) शासन निर्णय महिला व बालविकास विभाग शासन निर्णय क्रमांक ८२/२००१/मसेआ-२०००/प्र.क्र.४१५/का-२ मुंबई-३२ दिनांक २५/मे/२००१ मधील परिशिष्ट-३ अन्वये विहीत केलेल्या नमून्यातच उन्नत आणि प्रगट गटात मोडत नसल्याबाबतचे सक्षम प्राधिकाऱ्याचे (सन २०१४-१५) चे प्रमाणपत्र असणे आवश्यक राहील.

७.७ खुल्या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती/कुटूंबातील (क्रिमीलेअर) खेळाडू उमेदवारांना खेळाडूसाठी असलेले आरक्षण अनुज्ञेय असणार नाही. तसेच मागासवर्गीय प्रवर्गातील इतर मागासवर्गीय, भटक्या जमाती (क) आणि भटक्या जमाती (ड) या प्रवर्गातील उन्नत व प्रगत व्यक्ती अथवा गटातील खेळाडू सदस्यांना खेळाडूचे ५ % आरक्षण अनुज्ञेय राहणार नाही.

७.८ रोजगार कार्यालय, जिल्हा समाज कल्याण कार्यालय, सैनिक कल्याण कार्यालय इत्यादी कार्यालयाकडे नोंदणीकृत असलेल्या उमेदवारांनी देखील परस्पर संबंधित वन विभागाच्या कार्यालयाकडे विहीत केलेल्या पध्दती प्रमाणे अर्ज सादर करावा.

७.९ वनविभागात कार्यरत असलेल्या सर्व रोजंदारी मजूरांनी ते वनरक्षक पदाची पात्रता धारण करीत असल्यास वनरक्षक पदाकरिता विहीत केल्याप्रमाणे **ऑनलाईन अर्ज सादर करावा. इतर कोणत्याही अन्य मार्गाने अर्ज स्विकारले जाणार नाही.**

७.१० अनुभवाच्या बाबतीत तासिका, नियतकालिक, अंशकालिक, विद्यावेतन, अभ्यागत, अंशदानात्मक, विद्यावेतन तत्वावर केलेल्या अंशकालिन सेवेचा कालावधी तसेच प्रभारी म्हणून नेमणूकीचा कालावधी, अतिरीक्त कार्यभाराचा कालावधी अनुभवासाठी ग्राह्य धरण्यात येणार नाही.

७.११ पडताळणी अंती अर्ज रद्द ठरविणे, निवड प्रक्रियेत वेळेवर बदल करणे, उमेदवारांची अंतिम निवड करणे जाहिरातीच्या अनुषंगाने योग्य ती कार्यवाही करणे याबाबतचे संपुर्ण अधिकार निवड समितीने राखुन ठेवले आहेत.

७.१२ सेवाशर्तीनुसार अपात्र ठरलेल्या उमेदवारांना भरती प्रक्रियेच्या कोणत्याही टप्प्यावर वगळण्यात येईल.

७.१३ उमेदवारांना वनरक्षक पदाकरीता घेण्यात येणाऱ्या चाचणीकरीता कोणत्याही प्रकारचा भत्ता अनुज्ञेय राहणार नाही.

७.१४ वनविभागातील वनरक्षक या पदावर नियुक्ती करतांना एकुण ५ % पदे होमगार्डस् मध्ये कमीत कमी ३ वर्षे इतकी सेवा झालेल्या व वनरक्षक पदासाठी आवश्यक शैक्षणिक/शारीरीक पात्रता पुर्ण करणाऱ्या विहीत वयोमर्यादेतील तसेच विहीत पात्रता परिक्षा उत्तीर्ण होणाऱ्या होमगार्डस् मधुन भरण्यात येतील.

७.१५ सुशिक्षित बेरोजगारांना अर्थसहाय्य या योजनेअंतर्गत शासकीय कार्यालयामध्ये ३ वर्षापर्यंत दरमहा मानधनावर काम केलेल्या व रोजगार मार्गदर्शन केंद्रामध्ये या अनुभवाची नोंद केलेल्या पदवीधर/पदविकाधारक अंशकालीन उमेदवारांना शासकीय/निमशासकीय सेवेतील महाराष्ट्र लोकसेवा आयोगाच्या कक्षेबाहेरील गट-क पदवरील सरळसेवेने करावयाच्या नियुक्त्यांसाठी १० % समांतर आरक्षण लागु करण्यात येत आहे व त्यांना सध्याच्या वयाच्या ४५ वर्षे मर्यादेत आणखी १ वर्षाने वाढ करून सदर सवलत ४६ वर्षापर्यंत देण्यात येईल.

७.१६ उमेदवार हा शारीरीक क्षमता चाचणीकरिता शारीरीकदृष्ट्या सुदृढ असल्याबाबतचे प्रमाणपत्र संबंधित उमेदवाराने शासकीय वैद्यकीय अधिकारी यांचेकडून प्राप्त करून घेऊन धावण्याच्या चाळणी परिक्षेच्या वेळी सादर करणे आवश्यक राहील. अन्यथा त्यांना सदर चाचणीकरीता प्रवेश दिल्या जाणार नाही.

७.१७ पात्र उमेदवारांची धावण्याच्या चाळणी चाचणीबाबत संकेतस्थळावर कळविण्यात येईल.

**८. सेवाशुल्क :-**

उमेदवारांने उपरोक्त पदासाठी आवश्यक असलेले शुल्क खालिल प्रमाणे Mahaonline या संस्थेच्या मार्गदर्शक सूचनेमध्ये दिलेल्या पध्दतीने जवळच्या भारतीय स्टेट बँक शाखेमध्ये भरणाकरणे आवश्यक आहे.

| पदाचे नांव | खुला प्रवर्ग | राखीव प्रवर्ग |
|---|---|---|
| वनरक्षक | रु.३००/- | रु.१५०/- |

महाराष्ट्र शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक आरटीए-१०७९/०/४८२/१६-अ. दि. ३ जुलै १९८० मधील परिच्छेद क्रमांक २ मध्ये माजी सैनिकांना परीक्षा फी तसेच अर्जाच्या फी मधुन सुट दिलेली आहे.

| अ.क्र. | कार्यक्रम | दिनांक | |
|---|---|---|---|
| | | पासुन | पर्यंत |
| १) | अर्ज ऑनलाईन नोंद करण्याचा कालावधी | दि.२६.०९.२०१६ | दि.१७.१०.२०१६ |
| २) | संगणकीय चलानाद्वारे स्टेट बँक ऑफ इंडिया यांचे शाखेमध्ये शुल्क स्विकृतीचा कालावधी | दि.२६.०९.२०१६ | दि.१७.१०.२०१६ |
| ३) | ज्या उमेदवारांनी Online अर्ज दि.१७.१०.१६ रोजी सायंकाळपर्यंत करुन चलानची प्रत घेतली असल्यास सदर चलान बँकेत भरण्याचा अंतिम दिनांक. | दि.१८.१०.२०१६ | |

**९. अर्ज करण्याची पध्दत :-**

९.१ ऑनलाईन पध्दतीने अर्ज सादर करण्याबाबत सविस्तर सुचना Mahaonline या संस्थेच्या https://maharecruitment.mahaonline.gov.in या संकेतस्थळावर उपलब्ध आहे. विहीत केलेला नमूना अर्ज सदर संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

९.२ उमेदवारांने Online अर्ज करण्यासाठी उपरोक्त संकेतस्थळावर Apply Online या लिंकवर क्लिक करुन सर्वप्रथम प्राथमिक माहिती भरावी यानंतर रजिस्टर या बटणावर क्लिक करुन अर्जाची नोंदणी करावी. अर्ज इंग्रजीमध्ये भरणे आवश्यक आहे. आवश्यक माहिती भरल्यानंतर नोंदणी झाल्यावर संगणक प्रणाली उमेदवाराला Login ID व Password स्क्रिनवर दाखवेल. त्याची प्रिंट काढण्याची सुविधा उपलब्ध आहे. Online अर्ज करताना उमेदवाराने स्वतःचा अद्यावत फोटो (रुंदी ३ से.मि. व उंची ४.५ से.मि.) व स्वतःची स्वाक्षरी (रुंदी ३ से.मि. व उंची २.५ से.मि.) आणि ३०० DPI Resolution आणि ५० kb पेक्षा कमी साईज होईल, अशा विहीत पध्दतीने स्कॅन करुन अपलोड करणे अनिवार्य आहे.

(टिप फोटो व स्वाक्षरी अपलोड केल्यानंतर उमेदवाराने त्यांचाच फोटो व स्वाक्षरी अपलोड झाल्याची खात्री करावी. प्रवेशपत्र/अर्जावर दुसऱ्याचा फोटो/स्वाक्षरी असल्यास निवडीच्या टप्प्यामध्ये प्रवेश दिल्या जाणार नाही.)

**१०. परिक्षा शुल्काची रक्कम भरणा करण्याची पध्दत.**

१०.१ उमेदवाराने भारतीय स्टेट बँकेत चलानद्वारे, नेटबँकिंग, डेबीट कार्ड/क्रेडीट कार्ड द्वारे परिक्षा शुल्काचा भरणा करण्याकरीता उमेदवाराने खालिल नमुद केलेल्या पध्दतीचा अवलंब करावा.

१०.२ (१) Login ID व Password ची नोंद करुन Login केल्यानंतर मुख्य पृष्ठाच्या वरील भागातील "माझे खाते" या लिंकवर क्लिक करावे. (२) "माझे खाते" या लिंकवर क्लिक केल्यावर अर्ज केलेल्या कार्यालयाचे नाव निवडल्यानंतर अर्ज केलेल्या पदाची यादी शुल्क भरल्याच्या/न भरल्याच्या नोंदीसह दिसेल. ज्या पदासमोर Unpaid असे लिहलेले असेल, त्या ठिकाणी Pay now अशी लिंक उपलब्ध असेल. (३) Pay now या लिंकवर क्लिक केल्यावर दोन पर्याय उपलब्ध होतील. १.ऑनलाईन पेमेंट व २.चलानद्वारे. तसेच उमेदवार डेबीट कार्ड/क्रेडीट कार्ड द्वारे अथवा नेटबँकिंगच्या सहाय्याने ऑनलाईन पेमेंट करु शकतील. उपरोक्त कार्यवाही अर्ज सादर करण्याच्या अंतिम दिनांकापुर्वी पुर्ण करणे आवश्यक राहील. (४) उमेदवाराने चलानद्वारे हा पर्याय निवडल्यास उपलब्ध होणाऱ्या चलानची प्रत घेवून भारतीय स्टेट बँकेच्या कोणत्याही शाखेत, बँकेच्या कार्यालयीन वेळेत शुल्काचा भरणा केल्या जावू शकतो. (५) चलानद्वारे शुल्क स्विकारण्याकरीता भारतीय स्टेट बँक उमेदवारांकडुन सेवाशुल्काव्यतिरिक्त बँकेचे सेवाशुल्क आकारेल. अशा प्रकारे उमेदवारास चलानद्वारे शुल्क भरतांना सेवाशुल्क + बँकेचे सेवाशुल्क भरावे लागतील. (६) ज्या उमेदवारांना भारतीय स्टेट बँकेमध्ये चलानद्वारे शुल्क भरावयाचे आहे, असे उमेदवार अर्ज सादर केल्याच्या २ तासानंतर अथवा अर्ज सादर करण्याच्या शेवटच्या दिवशी बँकेच्या कार्यालयीन कामकाजाचे वेळेत परिक्षा शुल्क भरणे आवश्यक आहे.

१०.३ उमेदवाराने प्रिंट चलान या बटणावर क्लिक करुन चलान प्रिंट करावे. या प्रिंट केलेल्या चलानवर उमेदवाराने त्यांच्या प्रवर्गानुसार परिक्षा शुल्क स्टेट बँक ऑफ इंडीया या बँकेच्या कोणत्याही शाखेत कार्यालयीन कामकाजाच्या दिवशी वरील नमुद प्रमाणे विहीत मुदतीत भरणे आवश्यक राहील व याची एक प्रत उमेदवाराने स्वतःकडे जपून ठेवावी.

किंवा

१०.४ उमेदवाराने इंटरनेट बँकिंग अथवा डेबीट कार्ड/क्रेडीट कार्ड द्वारे त्याच्या प्रवर्गानुसार परिक्षा शुल्क विहीत मुदतीच्या आत भरावे.

१०.५ शुल्क भरल्यानंतर उमेदवाराने "अर्ज भरा" या लिंकवर क्लिक करुन आपला उर्वरित अर्ज भरुन पुर्ण करावा. अर्ज भरतांना उमेदवाराने वरील ९.२ मध्ये नमुद केलेल्या साईजचा स्वतःचा फोटो व सही अपलोड करणे आवश्यक आहे. माहिती पुर्ण भरल्यानंतर उमेदवाराने अर्जाची प्रिंट स्वतः काढावी व कागदपत्र पडताळणीचे वेळी सादर करण्यासाठी जतन करुन ठेवावी.

१०.६ विहीत मुदतीत परिक्षा शुल्क भरल्याशिवाय व ऑनलाईन अर्ज करण्याची प्रक्रिया पुर्ण केल्याशिवाय अर्ज विचारात घेतल्या जाणार नाही.

१०.७ उमेदवाराने ऑनलाईन अर्ज भरतांना स्वतःचा मोबाईल नंबर व ई-मेल आयडी न चुकता काळजीपुर्व भरावा.

**११. भरती बाबत अर्जदारासाठी इतर आवश्यक सूचना :-**

११.१ उमेदवाराने जाहिरात काळजीपूर्वक वाचावी.

११.२ निवड प्रक्रियेच्या कोणत्याही टप्यावर अयशस्वी ठरलेल्या उमेदवारांच्या बाबतीत कोणत्याही प्रकारचा पत्रव्यवहार केला जाणार नाही किंवा त्यांना लेखी सूचना दिली जाणार नाही

११.३ निवड होऊन नियुक्ती मिळालेल्या उमेदवारांना नियमानुसार संबधित पदाचे प्रशिक्षण पूर्ण करणे आवश्यक राहील.

११.४ वनरक्षक पदासाठी निवड झालेल्या उमेदवारांनी एक वर्ष/सहा महिने कालावधीचा वनरक्षक अभिक्रम प्रशिक्षण पाठ्यक्रम यशस्वीरित्या पुर्ण करणे आवश्यक राहील.

११.५ आरक्षित पदांकरिता उमेदवारांनी जात प्रमाणपत्र पडताळणी समितीचे वैध प्रमाणपत्र शासनाचे प्रचलित नियमानुसार **विहित वेळात सादर करणे आवश्यक राहील.** जात वैधता प्रमाणपत्र उपलब्ध नसल्यास शासन सामान्य प्रशासन विभाग निर्णय क्रमांक बीसीसी/२०११/प्र.क्र.१०६४/२०११/१६ब/ दिनांक १२/१२/२०११ मधील तरतुदीनुसार नियुक्ती आदेश निर्गमित केल्याच्या दिनांकापासुन ६ महिन्याचे आत जात वैधता प्रमाणपत्र सादर करणे अनिवार्य राहील. अन्यथा सेवा समाप्त करण्यात येईल.

११.६ उमेदवारांनी त्यांच्या उमेदवारीच्या संबंधात कोणत्याही प्रकारचा वशीला किंवा दबाव आणण्याचा किंवा गैरप्रकारचा अवलंब केल्यास त्याची उमेदवारी अपात्र ठरविली जाईल.

११.७ पोष्टाने अथवा इतर कोणत्याही प्रकारे आलेले अर्ज स्विकारले जाणार नाही. ऑनलाईन अर्जाची प्रत या कार्यालयास समक्ष अथवा पोष्टाने अथवा या कार्यालयाचे संकेत स्थळावर पाठवु नये.

११.८ उमेदवाराचे अर्ज ऑन लाईन पध्दतीने स्विकारण्यात येणार असल्याने अर्ज करतांना शैक्षणिक प्रमाणपत्रे व अन्य प्रमाणपत्र जोडणे आवश्यक नाही. तथापी ऑनलाईन अर्जामध्ये संपुर्ण माहिती भरणे आवश्यक आहे ऑन लाईन पध्दतीने अर्ज भरतांना काही त्रुटी राहील्यास अर्ज संगणकाद्वारे स्विकारला जाणार नाही त्यामुळे उमेदवारांने अर्ज परिपुर्ण भरण्याची दक्षता घ्यावी. अंतीम निवड पुर्व कागदपत्र तपासण्याचे वेळी सदर कागदपत्रे सादर करणे आवश्यक राहील. अर्ज एकदा ऑनलाईन सादर केल्यानंतर त्यात कोणत्याही प्रकारे बदल करता येणार नाही याची उमेदवारांनी नोंद घ्यावी त्यासाठी अर्ज करतेवेळी उमेदवारांनी आवश्यक सर्व तपशिल स्वत:जवळ तयार ठेवावा व अर्ज योग्य पध्दतीने भरला आहे याची खात्री करावी.

११.९ गुणानुक्रमे व आरक्षण विचारात घेवुन पात्र झालेल्या उमेदवारांची नावे उक्त संकेत स्थळावर जाहिर करण्यात येईल.

११.१० निवड झालेल्या उमेदवारांची नागपूर वनवृत्तांतर्गत कोणत्याही वनविभागात ग्रामीण व दुर्गम क्षेत्रात कोठेही नियुक्ती होऊ शकेल.

११.११ वनरक्षक पदासाठी धावण्याची चाळणी चाचणी ही उमेदवारांची कोणतीही कागदपत्रे तपासणी न करता घेतली जाणार असल्याने चाचणीचे आधारे उमेदवाराला निवडबाबतचे कोणतेही हक्क राहणार नाही. कागदपत्राच्या पुर्ण छाननीनंतर तसेच शारिरीक पात्रतेच्या पुर्ततेच्या अधिन उमेदवारांचे गुणवत्तेचे आधारे सामाजिक/ समांतर आरक्षण निहाय अंतिम निवड केली जाईल.

११.१२ पदभरती प्रक्रियेच्या वेळी उमेदवारास कोणतीही शारीरिक इजा पोहचल्यास अथवा नुकसान झाल्यास त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

११.१३ वनरक्षक पदावर नियुक्ती केलेल्या उमेदवारांची आंतरवृत्तीय बदली होणार नाही याची संबधीत उमेदवारांनी नोंद घ्यावी.

११.१४ भरतीसंबधी वेळोवेळी संकेतस्थळावर सुचना जाहिर करण्यात येईल. उमेदवारांनी नियमितपणे संकेतस्थळावर पाहणी करावी.

११.१५ विहित वयोमर्यादेतील ईच्छुक शासकिय/निमशासकिय कर्मचा-यांनी त्यांचे अर्ज त्यांच्या कार्यालयीन प्रमुखांच्या पुर्वपरवानगीने भरावे.

११.१६ अति उच्च गुणवत्ताधारक खेळाडुसाठी खेळाचे प्रमाणपत्र प्रधिकृत सक्षम अधिका-याचे असावे.

११.१७ जिल्हा रोजगार स्वयंमरोजगार मार्गदर्शन केंद्र या कार्यालयात नाव नोंदणी केली असली तरी वरील पदासाठी विहीत नमुन्यात स्वंतत्रपणे रितसर ऑनलाईन अर्ज भरणे आवश्यक राहील.

१२. निवड प्रक्रियेबाबत अटी/शर्ती/सुचनांमध्ये बदल/सुधारणा किंवा रद्द करण्याचे अधिकार मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर यांचेकडे राखुन ठेवण्यात आले आहे. कोणत्याही त्रुटया निदर्शनास आल्यास त्याप्रमाणे वेळोवेळी सुधारित आदेश/शुध्दीपत्रक संकेतस्थळावर निर्गमित करण्यात येईल.

**अध्यक्ष,**
वृत्तस्तरीय निवड समिती तथा
मुख्य वनसंरक्षक (प्रादेशिक), नागपूर.

**सदस्य सचिव,**
वृत्तस्तरीय निवड समिती तथा
उपवनसंरक्षक, नागपूर वनविभाग,नागपूर.

## उमेदवाराचे स्वाक्षरीत करावयाचे प्रतिज्ञापत्र

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो / करते की, अर्जात नमूद केलेली माहिती माझ्या माहितीनुसार सत्य आणि बरोबर आहे. त्यातील कोणतीही माहिती खोटी / चुकीची आढळल्यास मला निवड प्रक्रियेपासून अपात्र घोषित केले जाईल आणि जर निवड / नेमणुक झाल्यास, माझी सेवा कोणत्याही सुचनेविना समाप्त केली जाईल, याची मला जाणिव आहे.

मी याद्वारे शपथपूर्वक कथन करतो / करते की, मला शासकीय सेवेकरिता अपात्र घोषित केलेले नाही. मला फौजदारी गुन्हयात अटक वा शिक्षा झालेली नाही. माझ्या विरुद्ध कोणत्याही फौजदारी न्यायालयात खटला प्रलंबित नाही.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी दिनांक :-
(नाव व पत्ता)

---

**महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापत्र) नियम २००५ मधील प्रतिज्ञापत्राचा नमुना-अ**

## प्रतिज्ञापत्र

**(नियम -४ पहा)**

मी, श्री / श्रीमती / कुमारी ------------------------------------------श्री ------------------ यांचा / याची मुलगा / मुलगी/ पत्नी, वय ----- वर्ष, राहणार ----------------------- याद्वारे असे जाहिर करतो / करते की,

१) मी, ---------------------- या पदासाठी माझा अर्ज दाखल केलेला आहे.

२) आज रोजी मला -------------------(संख्या) इतकी हयात मुले आहेत. त्यापैकी दिनांक २८ मार्च २००५ यानंतर जन्माला आलेल्या मुलांची संख्या ----------- आहे.
(असल्यास जन्म दिनांक नमूद करावे)

३) हयात असलेल्या मुलांची संख्या दोनपेक्षा अधिक असेल तर दिनांक २८ मार्च २००६ व तदनंतर जन्माला आलेल्या मुलांमुळे सदर पदासाठी मी अनर्ह ठरविण्यास पात्र होईल याची मला जाणीव आहे.

ठिकाण :- अर्जदाराची स्वाक्षरी दिनांक :-

---

## वनरक्षक पदाच्या उमेदवाराने द्यावयाचे वचनपत्र

वनरक्षक पदभरती २०१६-१७ मध्ये मी खाली सही करणार वचनपत्र लिहून देतो की, वनरक्षक पदभरती २०१६-१७ मध्ये मी उमेदवार म्हणून आवेदनपत्र दाखल केले आहे. उपरोक्त भरती प्रक्रियाचा भाग म्हणून शारीरीक क्षमता चाळणी चाचणीमध्ये ------- कि.मी . (पुरुष उमेदवारास) ----- तासात / ----- कि.मी. ( स्त्री उमेदवारास) ------ तासात पुर्ण करण्याच्या चाळणी चाचणीमध्ये स्वच्छेने सहभागी होत आहे. सदरहू चाळणी चाचणीकरिता मी शारीरीक दृष्टया सक्षम आहे. उपरोक्त शारीरीक क्षमता चाळणी चाचणी दरम्यान माझी शारीरीक वा कोणत्याही प्रकारची हानी झाल्यास, त्यास शासन जबाबदार राहणार नाही.

करिता हे वचनपत्र लिहून देण्यात येत आहे

ठिकाण :-

अर्जदाराची स्वाक्षरी दिनांक :-